E-4959415

जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ /२०२५
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 09/04/2025

दक्षता विभागाचे परिपत्रक - १७

विषय- निविदाकारांनी तांत्रिक निविदेमध्ये सादर केलेल्या वस्तू व सेवा कराच्या (GST) पंजीकरण प्रमाणपत्राची वैधता तपासणेबाबत.

म्हाडा अंतर्गत विभागीय मंडळांच्या अखत्यारितील विविध प्रकारच्या कामांसाठी म्हाडाकडे / शासनाच्या विभागांकडे पंजीकृत असलेल्या निविदाकारांकडून निवीदा मागविण्यात येतात. कंत्राटदारांचे पंजीकरण करताना त्यांचेकडे इतर कागदपत्रांसहीत वस्तू व सेवा कर (GST) पंजीकरण प्रमाणपत्र आहे किंवा कसे याचा तपशील मागविला जातो व त्या तपशीलाच्या आधारे त्यांचे पंजीकरण केले जाते.

निविदाकारांनी निवीदा सादर करताना अन्य कागदपत्रांसोबत वस्तू व सेवा कर (GST) पंजीकरण प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असते. तथापि म्हाडा कार्यालयामार्फत मागील निवीदा उघडतांना निविदाकाराने सादर केलेले वस्तू व सेवा कर (GST) पंजीकरण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने वस्तू व सेवा कराचा अद्ययावत भरणा केला आहे किंवा कसे तसेच तांत्रिक निवीदा उघडण्याच्या तारखेस सदर प्रमाणपत्र वैध आहे किंवा कसे याची शहानिशा केली जात नाही. कराचा भरणा न केल्याने काही ठेकेदारांचे प्रमाणपत्र रद्द झाल्याबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, निविदाकाराची तांत्रिक निवीदा उघडल्यानंतर निविदाकाराने सादर केलेले वस्तू व सेवा कर (GST) पंजीकरण प्रमाणपत्र वैध आहे किंवा कसे, याची शहानिशा संबंधित विभागाकडून करण्यात यावी व तद्नंतरच निविदाकाराच्या तांत्रिक निविदेतील पात्र/अपात्रतेबाबतचा निर्णय घेण्यात यावा.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत: उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.